# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य

**प्रा. गीतांजली शंकरराव चव्हाण** राज्यशास्त्र विभाग, समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणीकाळभोर, पुणे. ता. हवेली, जि. पुणे., पिन कोड - 412201.

Email : geetanjalichavan1987@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्राची जडण-घडण करण्यात ज्या थोर पुरुषांनी मोठा वाटा उचलला त्यापैकी राजर्षी शाहू महाराज हे एक होते. राजर्षी शाहू महाराज हे प्रगतीशील विचारवंत होते. पुरुषप्रधान समाजात रुढी परंपरा आणि अंधश्रद्धांचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर सतत अन्याय होत होता.या पार्श्वभूमिवर शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराजांच्या एकंदरीत कार्याचा आढावा घेता, समाजातील उपेक्षीत घटकाला प्राधान्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

सामाजिक समतेच्या तत्वांचे पुरस्कर्ते आणि कृतीशील राजे म्हणून राजर्षी शाहू महाराजांकडे पाहिले जाते. त्यांची कारकिर्द म्हणजे न्याय आणि समातावादी कारकिर्द होय. विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा कार्यप्रवण राजा समाजहितासाठीच कार्यरत होता. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग करुन वंचित अशा सामाजाला शिक्षण देवून त्यांच्यात जाणीव, जागृती निर्माण केली. 19 व्या शतकातील बहुजन समाज अज्ञान आणि दारिद्र्याच्या अंधारात होता. हे सर्व शिक्षणाच्या आभावामुळे घडले होते. खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या, त्या काळात शिक्षण शिकायचे तर फक्त उच्च वर्गातीलच धनिक, जमिनदार यांनाच हक्क होता. गरिब, दलित व स्त्रीयांनी शिकणे हा गुन्हा आहे असे त्यावेळी मानले जायचे. शिक्षण हे आपले काम नव्हे ते ब्राम्हण, श्रीमंत, सावकार यांचे काम आहे, अशी समान्य माणसांची समजूत झाली होती. एकंदरीत शिक्षणापासून सर्वसामान्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न होता. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे,असे त्यांचे मत होते म्हणून त्यांचे शिक्षणासंबंधीचे कार्य त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात शिक्षणासंबंधी वेगवेगळया कायद्या वरुन व त्यांनी राबविलेल्या धोरणांवरुन आपल्या लक्षात येते.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून त्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, संदर्भग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट वरील संकेतस्थळे इत्यादी स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**-:राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य :-**

**1) स्त्री शिक्षण विषयक कार्य:-**कोल्हापूर संस्थानाचा स्त्री शिक्षणाविषयीचा दृष्टीकोण मुळातच पुरोगामी होता. संस्थानात मुला-मुलींच्या शाळा होत्याच, त्याशिवाय खास मुलींसाठी स्वतंत्र अशा शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या. विशेषत: **भुदरगड सारख्या सह्याद्री लगतच्या मागासलेल्या भागात** मुलींच्या शाळा स्थापन झाल्या होत्या. मुलींनी शाळेतयावे, मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे, यासाठी खास प्रोत्साहन दिले जात होते. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीतही राजर्षी शाहू महाराजांनी अत्यंत उदारदृष्टी ठेवली होती. खास करुन मागासलेल्या जातींच्या शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी 1919 मध्ये खास एक हुकुम गॅझेट केला होता. त्या अन्वये अशा स्त्रियांच्या राहण्याची व जेवणाची सर्व सोय दरबाराकडून मोफत केली जाणार होती. हुशार मुलींना पुढील शिक्षणात प्रोत्साहन मिळावे म्हणून दरबाराने खास शिष्यवृत्ती देखील जाहीर केल्या होत्या. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही राजर्षी शाहू महाराजांनी अत्यंत उदार दृष्टीकोण ठेवला होता. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले होते. स्त्री शिक्षणाचा प्रसार स्त्री शिक्षिका असतील तर अधिक वेगाने होवू शकतो, म्हणून स्त्रियांमधून शिक्षिका तयार करणे गरजेचे आहे. या भूमिकेतून शाहुंनी 1898 मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली आणि स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षणाच्या समान संधीची आवश्यकता सांगितली. एकूणच राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचा दर 0.10 टक्क्यांवरुन 0.35 % इतका झाला होता.

**2) प्राथमिक शिक्षण विषयक कार्य:-**राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात एक अभिनव प्रयोग केला होता. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार बहुजन समाजात झपाट्याने होण्यासाठी प्रत्येक गावी प्राथमिक शाळा सुरु केल्याहोत्या

आणि त्या शाळेत गावातीलच बहुजन समाजातील एक सुशिक्षित माणूस शिक्षक म्हणून नेमला होता. विशेष म्हणजे त्या शिक्षकाला ते पगार देत नव्हते. त्याला सरकारच्या मालकिच्या जमिनीपैकी काही जमीन शिक्षकी पेशासाठी इनामम्हणून दिली जात होती. शाहुंनी खेड्यापाड्यात देवळात, चावडीत, धर्मशाळेत प्राथमिक शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केलाहोता.

**3) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण:-** 8 सप्टेंबर 1917 रोजी छत्रपतिंनी सक्तीचा व मोफत शिक्षणाचा कायदा करुनप्राथमिक शिक्षणासाठीदरवर्षी 1 लाख रुपये खर्च करत असत. त्यासाठी त्यांनी देवस्थानच्या इमारतींचावापर शाळेसाठी करावा असा हुकूम काढला. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी त्यांनी विद्यार्थ्यांचे योग्य वय ठरवले होते. पाल्यास शाळेत न पाठवणाऱ्या पालकास दंड आकारला जात होता.

**4) माध्यमिक शिक्षण विषयक कार्य:-**कोल्हापूर संस्थानात 1867 मध्ये पहिली इंग्रजी पुर्व माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आली. ती कोल्हापूर हायस्कूल या नावाने ओळखली जात असे, पुढे तीच शाळा राजाराम हायस्कूल या नावाने ओळखली जाऊ लागली. या शाळेत मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण दिले जात असे, परंतू विद्यार्थ्यांच्या पैशांच्या अडचणींमुळे तेथे विद्यार्थीसंख्या रोडावली हे जाणून राजर्षी शाहू महाराजांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत केले.

**5) उच्चशिक्षण विषयक कार्य:-**उच्च शिक्षणाचा रितसर प्रारंभ राजाराम महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच झाला होता. तसेच संस्कृत विषय शिकवण्यासाठी संस्कृत महाविद्यालय सुरु करण्यात आले होते. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन मुलांना उच्चशिक्षणाची संधी मिळवून दिली आणिशेतीला प्राधान्य म्हणून शेती विषयक अभ्यासक्रमाची देखिल सुरुवात त्यांनीच उच्च शिक्षणात केली. त्यांच्या प्रयत्नवादी धोरणामुळेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संखेत लक्षणिय वाढ झाल्याचे दिसुन येते.

**6) तंत्र शिक्षण विषयक कार्य:-**समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी औद्योगिक, तांत्रिक, व्यवसायिक शिक्षणावर भर दिला होता. त्यासाठी त्यांनी 1912 मध्ये **जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टीट्युटची स्थापना** केली. तसेच अनेक व्यावसायिकशिक्षण देणाऱ्या शाळा सुरु केल्या होत्या.

**7) विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची स्थापना:-**राजर्षी शाहू महाराजांनी 1896 मध्ये कोल्हापूरात सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची स्थापना केली. वसतीगृहे ही त्या काळातील एक महत्वाची गरज होती. कारण त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामिण भागातील सर्व सामान्य लोक अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवण जगत होते. सहाजिकच आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत पालकांकडे नव्हती. तेंव्हा ग्रामिण भागातील गोरगरिब मुलांचे शिक्षण मार्गी लावायचे असेल तर शहरात त्यांच्या वास्तव्याची अल्प खर्चात व्यवस्था करणे गरेचे आहे. ही गोष्ट शाहू महाराजांच्या लक्षात आली आणि म्हणून त्यांनी कोल्हापूरात वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी 1901 मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी "व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस" ची स्थापना करण्यात आली. "मिस क्लार्क होस्टेलची" स्थापना 'अनुसूचित जातींच्या' विद्यार्थ्यांसाठी केली. अशा प्रकारे 1901 ते 1921 पर्यंत त्यांनी एकूण 22 वसतिगृहे स्थापन केली, म्हणूनच त्यांना **"भारतातील विद्यार्थी वसतीगृहाचे आद्य जनक म्हणतात"**.

**8) शाळांची स्थापना:-**सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी शाळांची स्थापना केली. उदा. पुरोहित शाळा, पाटील शाळा, सैनिक शाळा, संस्कृत शाळा. 'पुरोहित शाळा' व 'संस्कृत शाळा' या शाळांमध्ये वैदिक परंपरेचा विचार, तर खेडेगावातील सार्वजनिक कामे 'पाटील शाळेत' पाटलांनी योग्य प्रकारे करावी, 'सैनिक शाळेत' मराठा सैनिक चांगला सुशिक्षित व्हावा व 'संस्कृत शाळेत' बहुजन समाजातील मुलांनी संस्कृत शिक्षण घ्यावे असा उदात्त दृष्टीकोण राजर्षी शाहू महाराज यांचा होता.

**9) शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना:-**बहुजन समाजातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देवून राजर्षी शाहू महाराजांनी त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबले होते. 20 मे 1911 रोजी त्यांनी एक जाहीरनामा काढून ही सवलत प्रथम गरिब विद्यार्थ्यांना देवून नंतर राहिल्यास इतर विद्यार्थ्यांना द्यावी असा त्यांनी आदेश काढला.

**10) व्यवसायाभिमुख शिक्षण:-**व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी पारंपारिक शिक्षण देणाऱ्या शाळांव्यतिरिक्त व्यवसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन केल्या होत्या. त्यामध्ये 'टेक्निकल हायस्कूल', राधाकृष्ण मंदीरात "छत्रपति राजाराम औद्योगिक मंदीर",कलागृह औद्योगिक स्कूलची स्थापना. दिल्ली दरबार, पाटील शाळा, सत्यशोधक शाळा आणि तलाठी स्कूलची स्थापना. अशा वेगवेगळया व्यवसायाभिमुख शाळांची स्थापना राजर्षी शाहू महाराजांनी केलेली दिसते.

**11) कला शिक्षण:-**राजर्षी शाहू महाराजांनी कलांना आणि कलावंतांना प्रोत्साहन दिले होते. संगित कलेच्या शिक्षणासाठी त्यांनी 1913 मध्ये "देवल क्लबचा" आरंभ केला होता. त्यांनी शाहीर, मल्ल, कलावंत यांना आश्रय दिला होता. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात शाहीरीला प्रोत्साहन दिले, अनेक शाहीरांना सहाय्य केले. यावरुन त्यांच्या रसिक मनाची साक्ष पटते. शाहीर, तमासगीर, सत्यशोधक, जलसेवाले, कवी या सर्वांना सहाय्य केले. त्यामुळेच त्यांच्या कलेचा विकास झाला आणि शैक्षणिक दृष्ट्या बहुजन समाज प्रगतीपथावर आला.

**12) क्रीडा शिक्षण:-**राजर्षी शाहू महाराजांनी गावो-गावी तालमी, आखाडे स्थापन करण्यास मदत केली. जोर, बैठका, मल्लखांब, कुस्ती, दांडपट्टा,बरची, भाला, जांबिया इत्यादींचे शिक्षण तालमीत सुरु झाले. मल्लविद्येबरोबरच शस्त्रविद्येत गोवागावीचे तरुण पारंगत होवू लागले. स्पर्धेशिवाय प्रगती नाही हे त्यांनी जाणले होते. मल्लांच्या लढती वारंवार करावयाच्या ठरवून जत्रा-उत्सवाच्या व अन्य मंगलप्रसंगी कुस्तीचा शौक वाढीस लागला. कुस्तीसाठी राजर्षी शाहू महाराजांचे कोल्हापूर विशेष प्रसिध्द आहे.

**निष्कर्ष :-**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग हा वंचित अशा समाजाला शिक्षण मिळवून देवून त्यांच्यात जाणीव, जागृती, आत्मसन्माण निर्माण केला. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात लढवय्ये वीर कधीच निपजणार नाहीत, म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भारताला आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. खास मुलींच्यासाठीही स्वतंत्र शाळा स्थापन केल्या होत्या. विशेषत: मुलींनी शाळेत यावे मुलांच्या बरोबरीने शिक्षण घ्यावे यासाठी खास प्रोत्साहन राजर्षी शाहू महाराजांनी दिले होते. प्रौढ शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी विशेष लक्ष दिले. विशेषत: मागास जातींच्या शिक्षणाचा कळवळा राजर्षी शाहू महाराजांना अधिक होता हे लक्षात येते. राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था आजही योग्य रितीने कार्यरत आहेत. भारतीय राज्यघटेनेच्या कलम 45 मध्ये सक्तीचे व मोफत शिक्षण हा कायदा केला आहे. म्हणजे "शाहू महाराजांचा" शिक्षणाबद्दलचा दुरदृष्टीकोण व शिक्षणाबद्दल असणारी आधुनिक विचारांची प्रचिती आपणास येते. शिक्षणाबद्दलचे त्यांचे विचार आजही अत्यंत उपयोगाचे व लोकहिताचे आहेत हे आपल्याला समजते.

***संदर्भ ग्रंथ सूची ***

1) **डॉ. जयसिंग पवार (1989)**, राजर्षी शाहू- एक दृष्टीक्षेप, मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र.43-46.

2) **लोक कवी मनमोहन (1971)**, छत्रपति शाहू , सुरस ग्रंथमाला प्रकाशन, सोलापूर-2.

3) **प्रा. नानासाहेब साळुंखे (2007)**, शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.

4) **धनंजय कीर (1979)**, राजर्षी शाहू छत्रपति.

5) **माधवराव बागल (1950)**, श्री शाहू महाराज यांच्या आठवणी.

6) **ज्योती डोईफोडे (2005)**, मूलभुत सामाजिक विचार, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

**समाप्त :..........**